
आज़ादी का अमृत महोत्सव



रणक्रांति मल्टीडिसेंप्लेनरी रिसर्च जरनल RNI MAHMAR. 43768/18/12/2013.TC
ISSN-2454-8731
Peer Reviewed Journal, Impact Factor 5.057

भाई डॉ. केशवराव धोंडगे यांच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त ग्रंथाचे प्रकाशन

# वसा विचारांचा - फुले-शाहू-आंबेडकरांचा

कॅप्टन डॉ. दिलीप सावंत
संपादक

डॉ. उमेश पुजारी
सहसंपादक

.दलित कविता समाजातील अन्यायाचे , अत्याचाराचे दर्शन घडविते . व्यवस्थेने जो अन्याय केला . , त्यांना प्रश्न विचारते .म्हणूनच दया पवारांची हे महाकवे ही कविता उल्लेखनीय म्हणावी लागेल .ते म्हणतात ,

"हे महाकवे . ,
तुला महाकवी तरी कसे म्हणावे ,
हा अन्याय , अत्याचार ,वेशीवर टांगणारा ,
एक जरी श्लोक ज तू रचला असता .

तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते . '

ही कविता संस्कृती आणि शास्त्रांणी केलेला अन्याय स्पष्ट दर्शविते . एका नव्या समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहते .म्हणून त्या त एकसुरीपणा कुठे येतो? काही अभ्यासक म्हणतात ,दलित कविता म्हणजे एकसुरीपणा . परंतू यात एकसुरीपणा येतोच कुठे? व्यक्तींना जे हक्क हवे आहेत तेच तर ते मागतात.त्यांना मानव मुक्ती हवी आहे .तेच तर त्यांना मिळालेले नव्हते . म्हणूनच त्यांच्या कवितांचे विषय विद्रोही झालेले आहेत . माणसांच्या जगात माणसा एवढे मोठे दुसरे काही नाही .देव ,धर्म ',देश ही माणसांच्या निर्माण क्षमतेची आणि प्रतिमेची स्मारके आहेत. माणसामुळे देशपन येते .कलेला कला येते .म्हणून काल आणि आज दलितांची कविता ही मानासाची होते .समाज आणि व्यक्ती हा तिचा स्थायी भाव होऊन बसतो . कालही ती मानवी मुल्ये जोपासत होती आणि आजही ती मुल्याबरोबर, जागतिकीकरणावर भर देत आहे . मानवांचा सर्वांगीन विकास हाच मुख्य विषय घेऊन ती मार्गक्रमण करीत आहे.ती माणसाची कविता आहे . हिंदू रूढी , प्रथा ,परंपरा व संस्कार नाकारून नवे रूप धारण करते आहे . सर्वस्तरातून वादळ उठले पाहिजे . अशी तिची आकांक्षा आहे . दलितांचा माणूस म्हणून आदर न करतील, त्यांच्या घरादारावरून गाढवांचे नागर फिरवा. तेच सुक्ते आज दलित कविता रचित आहे.

सदर्भ सूची ..

१. दलित साहित्य : वेदना व विद्रोह - भालचंद्र फडके - पृ . 43
२. उ . नि .पृ . 49 .
३. उ . नि - पृ . 116
४. दलित साहित्य : उद्गम आणि विकास -. डॉ. अविनाश सांगोळकर - पृ - 40 .
५. खेळ 'दिवाळी अंक . शेरे निळकंठ - पृ . 8० .
६. रॉकगार्डन .. अरुण काळे .. पृ .. 22 .

आम्ही झालो गुंफा' ।उत्थानाचा " ( 5 )

त्यांच्या कवितेतील हा क्रांतिकारी आवेश आणि ती व्यक्त करण्यासाठी वापरलेली उग्र भाषा दोन्ही विचार करायला लावणारे आहेत .त्यांच्या या एकूणच दलितांच्या अपरंपार दुःखाचे व त्यातून निर्माण झालेल्या विद्रोहाची जाणे त्यांच्या या इथूनच दलितांच्या अपरंपार दुःखाचे व त्यातून निर्माण झालेल्या विद्रोहाची जाणीव होते .

1980 नंतरच्या कवितेतमात्र बदल झालेला दिसून येतो . यात पूर्वीच्या कवितेसारखा आवेश नाही . त्यात सोम्यता , शांतता आहे . हे लक्षात भरण्यासारखे आहे. यात या कवितेत मानवी मूल्य सांभाळली जाते .परंतु त्याबरोबर त्यांच्यावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडलेला दिसतो .एखाद्या डोंगरावरच्या पाण्याचा प्रवाह आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी प्रचंड वेग धारण करावा , तसा प्रचंड वेग आताच्या कवितेत पाहावयास मिळत नाही. 1990 नंतरच्या दलित कवितेविषयी निळकंठ शरे लिहीतात, "1990 नंतरच्या नव्या आर्थिक धोरणानंतर म्हणजे खाजगीकरण , उद्धारीकरण आणि जागतिकीकरण , भांडवलशाही आणि साम्राज्यवाद आपले हात पाय पसरू लागला होता. जातीय समीकरणासोबतच , वर्गीय समीकरणाच्या वेगाचीही प्रक्रिया दलित साहित्यिकांना उमगू शकली नाही . " ( 6 ) .हा निष्कर्ष एकंदर दलित कवितेविषयी असला तरी ,अरुण काळे सारखे कवी अपवाद आहेतच . फुले , शाहू ,आंबेडकरांचे विचार त्यांच्या कवितेचा मुख्य विषय आहे .व्यवस्थेच्या चिरेबंदीने सर्वांनाच बंदिस्त केले असतानाही ते कोणालाही विरोध करीत नाही . हा प्रश्न केवळ अरुण काळेनांच पडत नाही , तर त्यावेळेसच्या सर्वच कविंना पडतो आहे. ते म्हणतात,

"इथ पावसाना चिखल ,
ढगांना विजा,
सावली उन्हाला ,
का करीत नाही विरोध ?" ( 7 )

मराठी साहित्यातील अरुण काळे असा दलित कवी आहे की त्यांनी जागतिकरणा बरोबर सामाजिक समस्यावरही लक्षवेधी लेखन केले आहे . माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांनी लेखन केले .जागतिकीकरणामुळे झालेला बदल हा वास्तववादी आहे .त्याचे दर्शन कवितेतून घडते . त्यांचे कविता मानवी मूल्यांचाविचार करायला भाग पाडते .

एकंदरीत ,पूर्वीच्या कविताही मानवी मूल्यांना स्पर्श करून मानवांचे हक्क आबाधित ठेवण्यासाठी लिहिल्या गेल्या . त्यातून उच्चवर्णीयांच्या पाखंडीपणा वर हल्ला चढविला गेला .आणि आता मानवकेंद्रबिंदू मानून जागतिकीकरणात त्यांच्या व्यथेचा स्पष्टीकरण खोलपणे मांडण्यात आले आहे .दोन्ही कवितेतून सामाजिक आणि सांस्कृतिक विषमता नष्ट करणे हा दलित कवींचा उद्देश आहे . ही दलित कवींच्या मनाची एक समजूत आहे . त्यांचा उद्देश केवळ संस्कृतीने ज्याप्रमाणे जीवन लादले ते आलेले अनुभव त्यानी मोकळेपणाने मांडलेले आहे

"वामनदादा कर्डक यांनी आपली कविता घेऊन दलितांच्या झोपड्या झोपड्यातून गेले .ते आपल्या कविते मागची भूमिका स्पष्ट करताना म्हणतात , "मी जेथे जन्माला आलो ज्या मातीत वाढलो आणि ज्या अन्य खाली भारतात गेलो . त्यांचे मला आठवण आहे .ती कैफियत मी शब्दात मांडतो .त्या तुम्ही कविता म्हणा किंवा म्हणू नका . मला जे प्रामाणिकपणे जे जाणवले ते मांडले .त्यांचे बाबासाहेबांच्या विचारावर असीम श्रद्धा होती .नेतृत्वावर विश्वास होता . म्हणूनच त्यांनी दलितांच्या मनांत जळजळीत अंगार पेटविला ."(3)ते म्हणतात ,

"तुफानातील दिवे आम्ही ' तुफानातील दिवे ,
तुफान वारा ,पाऊस धारा
मुळींना आम्हा शीवे".

असा उच्च स्वरूपात कोणाच्याही मनाची पर्वा न करणारा .क्रांतीगीते गाणारा कवी . भाष करताना कोणाचाही विचार करीत नाही .निर्भिडपणे ज्वालामुखी सारखा प्रकट होतो . गावागावात दलित वस्तीत वस्तीवरच्या आया-बहिणींवर अत्याचार होतो .त्यामुळे त्यांचे मन सुन्न होते . हे लोक अन्यायमविरोधात पेटून का उठत नाही याची सल त्यांना अस्वस्थ करते . आणि त्यातूनच तयार होतो विद्रोह .दलित कवितेचा मुख्य उद्रेक 1970 ते 1975 या काळात झालेला आहे . ढसाळ राजा ढाले हे कवी 1970 च्या आधीच कविता लिहीत होते . परंतु 1970 ते 1975 या पाच वर्षाच्या काळात दलित कवितेमुळे केवळ मराठी कवितेच्या क्षेत्रातील नव्हे तर एकूणच मराठी साहित्य क्षेत्रात वातावरण ढवळून निघाले आहे .

ज्येष्ठ समीक्षक गंगाधर पानतावणे यांनी दया पवारांच्या कवितेचे वेगळेपण नेमकेपणाने दाखविले आहे. ते म्हणतात , "दया पवार यांची कविता राखे खालच्या अंगारा सारखी होती .आत पेटलेला जाळ . पण वाचकांना ती अस्वस्थ करीत होती .नामदेव ढसाळचा उधळणारा घोडा त्याचं नव्हता . पण संयमपणे व्यक्त होणारा विद्रोहाचा आविष्कार मात्र निश्चित होता . ( 4 ) .दया पवार यांच्या कवितेत वाचकांना अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य निश्चितच होते. ते म्हणतात ,'

"आज विषाद वाटतो कशा वागविला मनामनाच्या बेड्या ,
गावाचा हत्तीचा कळप रुतावा तशा धैय आकांक्षा आकांक्षा रुतलेल्या ,
शीळ खाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा .
किती जन्माची ही कैद ,कुणी निर्मिला हा कोडवाडा । ।"

त्यांची कविता स्वतःही अंतर्मुख होऊन ,आपली अंतर वेदना प्रभावीपणे व्यक्त करते .दलित कवितेचा निर्माण झालेली कोंडी फोडण्याचे कार्य डॉक्टर यशवंत मनोहर यांनी 'उत्थानगुंफा 'या आपल्या पहिल्या कवितासंग्रहात ने केले आहे . पाखंडी , बेगडी लोकांना आपल्या जागृतीचा इशारा देताना ते म्हणतात , "पाखंडयानो आता ।
नका मारू थापा ।

.आम्ही माणसे आहोत आम्हालाही जीवन जगण्याचा अधिकार आहे यांचा एल्गार आवाज उठविणारी आहे. ती निशंक निधडी आहे. तिला दलितांच्या मुक्ती लढ्यासाठी पेटीत समाजातील दुरीचे, अंधश्रद्धा, उपेक्षा संकुचितपणा नष्ट करावयाचा आहे .त्यांच्या कवितेची धार स्वातंत्र्य समता बंधुता व न्याय या मानवी मूल्यांसाठी आहे. म्हणून या भूतलावरील,
"जे का रंजले गांजले त्याशी मने जो आपुले ।तोचि देव ओळखावा तेथे ची देव जाणावा। या संताच्या वचनाप्रमाणे मानव सेवेची वृत्त घेणारी ही दलित कविता आहे .नवनवे रूप धारण करते. मानवमुक्ती हा पूर्वीचाच विषय एक नव्या रुपाने आज आपल्या समोर मांडताना दिसते.

आज दलित कवी त्यांची नवनवे रूप नामदेव ढसाळ , वामन निंबाळकर , दया पवार ,केशव मेश्राम , वामन होवाळ 'इंद्रजीत भालेराव ,यशवंत मनोहर यांच्या कवितेतून पाहावयास मिळतो. या कवींची कविता आधीच्या दलित कवितेसारखे कलात्मकता हरवून बसलेली ,प्रचारकी ,आवेशी थाटाची नाही .तर ती साधी सरळ निर्भीडपणे मानवी व्यथा मांडणारी आहे . स्वातंत्र्यआधी वाटत होते ,आपला देश गुलामीत आहे . स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपणही स्वातंत्र्याची फळे चाखू .अशी आशा होती , परंतु स्वातंत्र्यानंतरही ती फेल झाली . यावेळेस स्वातंत्र्याला शिव्या देणारे कवी नामदेव ढसाळ आपल्यासमोर येतातच त्यांच्या कवितेतील आक्रोश , आवेग हा पाहण्यासारखा आहे. तो पुढील प्रमाणे .15 ऑगस्ट 1947 या कवितेत त्यांच्या मनाच्या घालमेल याचे चित्र स्पष्ट दिसतेच . म्हणून त्यांनी स्वातंत्र्याची व्याख्याच बदलून टाकली . स्वातंत्र्याच्या संदर्भात त्यांचे विचार उल्लेखनीय आहे ते म्हणतात ,

"15 ऑगस्ट 1947 ,
एक भंगगोष्ट महाकाव्य ,
स्वातंत्र्य कंच्या गाडीचं नाव आहे ,
कितव्या रामराज्यात राहतो आम्ही "

नामदेव ढसाळांच्या या कवितेचा सरळ अर्थ आहे त्यांना कोणत्याही परिस्थितीत मिळालेला स्वातंत्र्य मान्य नाही . ज्या स्वातंत्र्याचा अर्थ सामान्य लोकांना कळाला नाही असे स्वतंत्र काय कामाचे .असे स्वातंत्र्य म्हणजे गाढव .स्वातंत्र्य आणि गाढव सारखीच . स्वातंत्र्य मिळूनही मानवी मूल्ये पायदळी तुडवली गेली .वाटत होतं स्वातंत्र्यात आम्हाला माणूस म्हणून वागणूक मिळेल अशी आशा होती ,परंतु तसे झाले नाही . हे स्वातंत्र्य उच्चवर्णीय साठीच रामराज्य ठरले आहे . म्हणून कवी नामदेव ढसाळ यांनी स्वातंत्र्याला गाढवांची उपाधी देऊन आपला विद्रोह प्रकटपणे जाहीर केलेला आहे .म्हणूनच विद्रोही भाषा करणारे बंडखोर कवींच्या यादीत नामदेव ढसाळांचे नाव कोरल्या गेले . हे किती योग्य आहे? .. हा चिंतनाचा विषय नाही का? उच्चवर्णीयांनी यांचे आत्मपरिक्षण करावे असे त्याना वाटत नाही .?. म्हणूनच दलित कविंची बडखोरांची यादी वाढत गेली . या त्यांचा कुठलाही दाब नसताना परंपरेनुसार दोषी ठरविण्यात आलेले आहे.

'हरी मज पशु कर वा पक्षी कर ,
परि करू नको महार ,
पशू - पक्षी केलिया तर हिंदू शिकविती .
यास्तव पशू कर वा पक्षी ,
महार केलिया विटाळ माणूनी शिक्षण बंदी करिती ॥

यावरून विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच अस्पृश्यांच्या जीवनामध्ये किती यातना व वेदना असतील यांची कल्पना येतेच. त्याकाळी हिंदुधर्माचा जो दैववादाचा पगडा होता त्यामुळे माणसाला माणूस म्हणून जगता आलेले नाही .हिंदूधर्मात जन्म नको. हा धर्म केवळ पशु पक्षांनाच जवळ करणार आहे असे कवी म्हणतो.या कवींच्या आधी माणसांच्याव्यथा मांडण्याचा प्रयत्न झालेला नाही असे नाही? तेव्हाही प्रयत्न झालाच,परंतु त्याची तीव्रता मात्र कमी होती. केवळ उच्चवर्गीयांकडे याचना करण्यापलीकडे काहीच झाले नव्हते. शिक्षणाच्या सर्व वाटा उच्चवर्णीयान पर्यंतच येऊन थांबलेल्या होत्या. त्यामुळे स्वतःचे अस्तित्व कधी ही माणसांना कळाले नाही. परंतु डॉक्टर बाबासाहेबांचे गुरु संत कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनीही शिक्षणाचे महत्त्व सांगितले. त्यामुळे अनिष्ठ परपरा हळूहळू बंद होऊ लागल्या . अस्पृश्यता काय आहे हे सामान्य लोकांना कळू लागले. म्हणूनच शिक्षणाचे महत्व पुढे बाबासाहेबांनी तळागाळातल्या लोकांना समजावून सांगितले .शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हा मंत्र लोकांनी प्राशन केला. म्हणूनच बाबासाहेबांच्या तत्वांना आणि विचारांना दलित कवींनी साहित्यातून अतिवेग आणलेला दिसून येतो.

वेदनेचे आदीरूप संत चोखामेळा. यांनीहीअस्पृश्यांची वेदना मांडली. परंतु त्यात विद्रोहाची प्रखर तीव्रता दिसलेली नाही. केवळ देवांच्यापुढे याचना करण्यात आली. आपल्या वेदना मांडण्याच्या पलीकडे काय झालेला दिसत नाही. यांच्या आधी तेराव्या शतकात वेगवेगळे संप्रदाय उदयाला आले. त्यात मानुभाव पंथही येतो. या पंथाच्या माध्यमातून मानवमुक्तीचा नारा दिला गेला. स्त्री-पुरुष समानता ही दिसते. अशावेळी या पंथाची दीक्षाही अनेक लोकांनी घेतली. आणि त्यांनी आपल्याच जातीतल्या लोकांना, आम्ही वरच्या जातीचे आहोत असे भासविले. या विचारांचा समाचार त्यांनी घेतला. त्यामुळे त्यांनाही त्रास झाला पण आपल्या विचारापासून तीळभरही हे कवी मागे हटले नाही.

वारकरी संप्रदायाचीही कविता विषमतेच्या जवळ आली परंतु त्यातही दैववादाचा स्पर्श आहे,- धर्माचा पगडा आहे.तेव्हापासून तर सतराव्या शतकातील तुकोबांनी ही धर्म व्यवस्था, पाखंडीपणा, अस्पृश्यता यासारख्या बाबी उध्वस्त करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. म्हणूनच यात अठरापगड जातींचे लोक सामाविष्ट झाले. परंतु फारसे यश आलेले आहे असे दिसत नाही. हे यश स्वातंत्र्यापर्यंत टिकलेले नाही. इंग्रजपर्यंत ते यश टिकले. त्यानंतर नाही. दलित कविता समूह मनाच्या वेदनेची कविता आहे. माणसाने आपल्या मुक्तजीवनाचे गाणे गाणार यांची आहे

हा एवढ्च म्हणावे लागेल की काही प्रमाणात नक्कीच बदल झालेला आहे . तेही डॉक्टर बाबासाहेबांच्यामुळे दलित वर्गात एवढा बदल झाला की ज्यांना आपल्या अधिकार कळत नव्हते त्यांना अधिकार कळाले . जीवन कसे जगावे हे माहीत नव्हते त्यांना माहीत झाले . त्यांच्या घराघरांमध्ये क्रांतीचा सूर्य पोहोचला .ज्याठिकाणी अंधाराचे साम्राज्य होते , त्याठिकाणी उजेड यांचे साम्राज्य आले .म्हणूनच दलित साहित्यिकाने आपल्या साहित्यातून कालच्या वेदना आणि आजचा नवीन अविष्कार विद्रोही स्वरूपात मांडलेला आहे . त्यातील कविता हा एक प्रवाह. मराठी दलित कविता ही .बाबासाहेबांच्या विचारांचे अधिष्ठान असलेली कविता आहे .स्वातंत्र्य ,समता ,बंधुता व न्याय या मानवी मूल्यांची पुरस्कार करणारी आहे .दलित समूहाची वेदना या कवितेत आहे . ती बाबासाहेबांची विचारधारा आहे ."बाबासाहेबांनी आपल्या अज्ञानी बांधवांना त्यांनी ज्ञानाची वाट दाखविली .दारिद्र्यात खितपत पडलेल्या दलीतांची अस्मिता जागृत केली . अन्याय ,छळ निमूटपणे सोसणाऱ्या दलितांच्या मनात विचारांची ठिणगी टाकली . त्यांना खात्री होती की विचार तलवारीपेक्षा ही प्रखर असतो . विचार परिवर्तन घडवून आणतो .विचार नवजीवन देतो . विचारांचा वन्ही प्रखरतेने पेटविल्याशिवाय अज्ञानाची खुळेपणाची कश्मले जळून जाणार नाहीत .म्हणून डॉक्टर बाबासाहेब म्हणजे एक मूर्तिमंत विचार .आपल्या वाणीने आणि लेखणीने घणाघात घालून त्यांनी साक्षात मातीतून माणूस निर्माण केला . म्हणूनच तर प्रत्येक दलित लेखकांचे सस्फूर्तिस्थान , श्रध्दास्थान बाबासाहेब हे आहेत' ' ( १ ) . अहो चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या हिंदूधर्मात समता कशी स्थापन होणार . , असा कडक सवाल 'दीक्षा '.ग्रहण करताना डॉक्टर बाबासाहेबांनी जनतेला केला होता . या व्यवस्थेमुळेच हिंदुस्थानात जातीभेदाचे विष हिंदूधर्मात खोलवर जाऊन भिनले . शूद्र आणि शूद्रातिशूद्र यांच्या बालमनावर बिंबवण्यात येते . आपला जन्म चातुर्वर्ण्याची सेवा करण्यासाठीच झालेला आहे "या पृथ्वीतलावर अस्पृश्य म्हणून माणसाला जिथे कुत्र्या मांजरापेक्षाही हीन पध्दतीने वागविण्यात येतेअसा भारत हा देश आहे . समाजाचा कसलाही अपराध न करता वर्षानुवर्षे अस्पृश्यतेची राक्षशी शिक्षा भोगत असलेल्या दुर्दैवी जगातील बाबासाहेबांच्या वाट्याला आला . तो निर्दयीछळ उच्चवर्णीय समजणार ..? यांनी त्यांना जन्मभर छळले .त्यांच्या विद्वत्तेचे कुणी कौतुकही केले नाही .अत्रे म्हणतात ,त्याप्रमाणे धार्मिक व सामाजिक पारतंत्र्याच्या नरकात पाच हजार वर्ष सडत पडलेल्या सात कोटी गुलामांना स्वतंत्र करण्यासाठी तळहातावर शीर घेऊन ,जो नरवीर साऱ्या हिंदू समाजासी आयुष्यभर लढला त्या बाबासाहेबांचे नाव भारताच्या सुवर्णाक्षरात लिहिले गेले आहे . ( 2)

त्यांची प्रेरणा घेऊन भारतातल्या तमाम दलित साहित्यिकांनी कवींनी आपल्या वेदना ज्वालामुखी सारखा मांडल्या आहेत . उच्चवर्णीयामुळे अस्पृश्यांचे जीवन पशु -प्राण्यांपेक्षा कसे हिन दर्जाचे आहे , ते कवितेच्या रूपानें किसन बनसोड यांनी मांडले आहे . ते म्हणतात ,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व श्री शिवाजी कॉलेज
ऑफ आर्ट्स्, कॉमर्स अँड सायन्स, ता. कंधार जि. नांदेड आयोजित
राष्ट्रीय चर्चासत्र २७ डिसेंबर २०२१
ISSN: 2454-8731

# दलित कवितेतील विद्रोह : काल आणि आज..

डॉ. लक्ष्मण पवार
मराठी विभाग
हु. जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर .

भारत ही कर्मयोगीची तसेच बंडखोरांचीही जन्मभूमी आहे. अन्याय, अत्याचार, जुलूम या विरुद्ध बंडाचे निशाण उभे करून सर्वस्व समर्पण करणाऱ्या थोर बंडखोरांची परंपरा या देशात आहेतच . परंतु स्वतंत्र भारतातही आहे .ही परंपरा कालही होती आणि आजही आहे . आणि अविरतपणे चालूही राहील . यात कोणतीही शंका नाही यात जेवढे विषमतेचे विष ,वेदना आहे . तेवढे आज जगाच्या पाठीवर कुठेही सापडणार नाही . हजारो वर्षाची परंपरा आहे . माणूस जन्माला आला की त्यांची जात सोबत जोडल्या जाते . अशावेळी त्या व्यक्तीने त्याच जातीच्या नियमांमध्ये बंदिस्त राहून लहानाचे मोठे व्हावे आणि त्याच्यातच मरावे ही आमची स्वतंत्र भारताची परंपरा ... या परंपरेच्या विरुद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न केला नाही असे नाही ,तो प्रयत्न वारंवार केला गेला . त्यांच्या हक्कासाठी ती माणसे झगडले .लढली . परंतु त्यांचे झाले काय ,तर धर्माच्या नावाखाली ,वर्णव्यवस्थेच्या नावाखाली सामान्य लोकांना पशूपेक्षाही हिन दर्जा मिळाला .त्यांचे जगण्याचे स्वातंत्र्य नाकारले . हिंदूधर्माचे धर्मग्रंथ धुंडाळले की , त्यातील तात्विकता आपल्यासमोर येते . फक्त शोधणारी दृष्टी लागते .काय दोष होता ?महाभारतातल्या एकलव्याचा .काहीच नाही . जन्माने शूद्र , वनवासी असल्यामुळे त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा कापला गेला . धनुर्विद्या शिकतांना त्यांनी कोणत्या गुरूंच्या सानिध्यात नव्हते . केवळ ब्राह्मण गुरु द्रोणाचार्याचा पुतळा लावून घेतल होत . हाच काय तो दोष . नाही तर हा दोष आहे? . वर्णव्यवस्थेचा , परंपरेचा हा दनका ?एकलव्यचा दोष नाही तर याठिकाणी दोष आहे केवळ गुरूंचा .वनवासी असणे हा गुन्हा आहे का.? नाहीच परंतु आमच्या धर्म , धर्मग्रंथाने बंदिस्त करून टाकले . म्हणून वर्ण व्यवस्थेतील शेवटच्या घटकाने कसे जगावे ?काय ? हा आजही संशोधनाचा विषय आहे . या व्यवस्थेचा , यांचा उल्लेख आमच्या दलित बांधवांनी साहित्यामध्ये विद्रोही स्वरूपात केलेला आहे . त्यांनी धर्मग्रंथांना , महाकाव्यांना प्रश्नच केला आहे . महाभारत काळापासून दलितांचा छळ होता .हे सत्य आता नाकारता येत नाही .त्यामुळेच आपण बांधून चालविणार आहोत हेच ते नसेल तर आपण पुतळारुपी घेतलेली विद्या कुचकामी होईल .हे अंतिम सत्य माहीत असतानाही एकलव्य कशाचीही पर्वा न करता क्षणात अंगठा कापून देतो . हा त्यांचा चूक आहे का ?हा त्यांच्या मनाचा नितळपणा . हा पूर्वी होता आणि आजही हाच नितळपणा पुरुषांकडे मागासवर्गीय कडे दिसून येतो . हा त्यांच्या मनाचा मोठेपणा नाही का? असा मोठेपणा केवळ अस्पृश्यकडेच असतानाही तो गुरुना का दिसला नाही ?.हा तर चिंतनीय स्वरूपांचाच प्रश्न आहे आणि आजही हा प्रश्न सुटलेला नाही .

# अनुक्रमनिका


| अ.क्र. | संशोधन विषय | लेखकाचे नाव | पान. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | मराठी काव्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्वज्ञान | साईप्रसाद मधुकर पंडीत | 01 to 05 |
| 2 | फुले–शाहू–आंबेडकर यांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव | 06 to 09 |
| 3 | राजेंद्रकुमार लक्ष्मणरावडॉ. बाबसाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची संकल्पना | प्रा. डॉ. राहुल ज्ञानेश्वर कापुरे | 10 to 12 |
| 4 | छत्रपती राजश्री शाहू महाराज आणि स्त्रीमुक्ती कायदे | प्रा. डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव | 13 to 17 |
| 5 | मानवतावादी क्रांतिकारक – महात्मा जोतीराव फुले | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 18 to 22 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीविषयक भूमिका | डॉ. रवींद्र बेम्बरे | 23 to 28 |
| 7 | महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार | प्रा.डॉ.वनमाला लोंढे | 29 to 34 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास | डॉ. मयुरी राजेश्वर फुके | 35 to 38 |
| 9 | Towards Harmony: "A Study of Communal Deadlock And A Way To Solve It" by Dr. B R Ambedkar | Preetha Prabhasan | 38 to 43 |
| 10 | महात्मा जोतिराव फुले यांची बहुजन संस्कृती विषयक विचार | डॉ. संजय बालाघाटे, | 44 to 48 |
| 11 | राजर्षी शाहू महाराजांचे लोकाभिमुख प्रशासन | डॉ. गायकवाड चंपत दाउ | 49 to 51 |
| 12 | म. फुलेंची स्त्री शिक्षण विषयक भूमिका | डॉ. दिपक पवार | 52 to 53 |
| 13 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार | प्रा.डॉ.पी.डब्ल्यू.पाटील | 54 to 58 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य | डॉ. प्रताप गायकवाड, | 59 to 66 |
| 15 | म.फुले–राजर्षीशाहू–डॉ.आंबेडकर आणि मराठी साहित्य | लिंगप्पा गुळाळे, | 67 to 74 |
| 16 | महात्मा फुले यांचे कृषीविषयक विचार | डॉ. शंकर लेखने | 75 to 80 |
| 17 | आंबेडकरवादी साहित्याचे उर्जास्त्रोत :– फुले–शाहू–आंबेडकर | धनंजय पांडुरंग सोनकांबळे | 81 to 83 |
| 18 | राजर्षी शाहूमहाराज : एक परिचय | प्रा. ज्ञानेश्वर भोसले | 84 to 91 |
| 19 | नवीन शैक्षणिक धोरणावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव | डॉ. देवेंद्र रमेशराव भगत, | 92 to 96 |
| 20 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्रि मुक्ती विचार | डॉ. भारत शिंदे | 97 to 99 |
| 21 | महात्मा ज्योतिबा फुले – विचार आणि कार्य | डॉ सुधीर ब.गायकवाड | 100 to 10 |
| 22 | छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक विचार – एक चिकित्सक अभ्यास | प्रा. सोनकांबळे बी. जी. | 105 to 10 |
| 23 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य | शितल संग्राम सालवाडगी | 110 to 11 |
| 24 | दलित कवितेतील विद्रोह : काल आणि आज.. | डॉ. लक्ष्मण पवार | 116 to 12 |
| 25 | डॉ. भीमराव आंबेडकर और सामाजिकता | प्रा. डॉ. यु. ए. सय्यद | 123 to 12 |
| 26 | म. फुले यांचे शेती विषयकविचार कार्य व वर्तमान स्थितीतील प्रासंगिकता. | प्रा. अमोल सुदामराव श्रीखंडे | 128 to 13 |
| 27 | राजर्षी शाहू महाराजांचे क्रीडा विषयक धोरण | प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, | 132 to 13 |